LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १६ वा फोन २३०१०१ दिनांक १४ डिसेंबर २०२५ रविवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

## लाडक्या बहिणींना 'ई-केवायसी' दुरुस्तीसाठी मिळणार एकच संधी

नागपूर दि.१३ (वृत्तसेवा):- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना ई-केवायसी प्रक्रिये दरम्यान झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी अंतिम आणि एकमेव संधी देण्यात येणार आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी शनिवारी याबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केली असून, ही सुधारणा प्रक्रिया ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



योजनेच्या बहुतांश लाभार्थी दुर्गम आणि ग्रामीण भागातील असल्याने ई-केवायसी करताना चुका होणे स्वाभाविक आहे. अशा चुका दुरुस्त करण्याबाबत विभागाकडे अनेक निवेदने प्राप्त झाली होती. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या या योजनेत लाभार्थींना संधी देणे गरजेचे असल्याने, ई-केवायसीमध्ये केवळ एकदाच सुधारणा करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच, पती किंवा वडील हयात नसलेल्या किंवा घटस्फोटित महिलांना ई-केवायसी प्रक्रिया स्वतः पूर्ण करण्यासाठी पोर्टलवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे सादर करून या महिलांना योजनेचा लाभ सुरळीत मिळावा, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. ई-केवायसी प्रक्रिया अधिक सुलभ व सोपी करण्याबरोबरच जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळावा, पान २ वर

# एस.पी.साहेबांचे अभिनंदन, मनावर घेतलं तर काय होऊ शकतं हे पोलिसांनी दाखवून दिलं महामार्गावर लुटमार करणारी टोळी पकडली



बीड दि १३ (प्रतिनिधी)–गेवराई, बीड, धाराशिव शहरामधून जात असलेल्या धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गासह बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रवाशांची वाहने अडवून काचा फोडणे, शस्त्राचा धाक दाखवून मारहाण करत दरोडा व जबरी चोरीच्या घटनात्मक मोठी वाढ झाली होती. तर गेवराई ते तुळजापूर दरम्यान या महामार्गावरील दहा १० ठिकाणे धोक्याची असल्याची सूचना खूद्द पोलिसांच्या वतीने करण्यात आली होती. या घटनाकडे स्वतः बीडचे पोलीस अधीक्षक यांचे लक्ष वेधले असता त्यांनी या घटनातील गुन्हेगारांचा पर्दाफाश करण्याचे सक्त आदेश आपल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना दिल्यानंतर या शाखेतील संबंधित पथक पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार प्रशंसनेला देखील पात्र ठरले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या महत्तम प्रयत्नाला अखेरीस यश आले आणि सदर महामार्गसह बीड जिल्ह्यात अशा घटना घडवणाऱ्या गुन्हेगार टोळीचा पर्दाफाश करून यातील काही जणांना अटक केली आहे. या कारवाईत दरोड्याचा १ व जबरी चोरीचे ३ गुन्हे प्राथमिक तपासात उघडकीस आले आहेत. पोलिसांनी मनावर घेतलं तर काय होऊ शकतं हे पोलिसांनी या टोळीला गजाआड करुन दाखवून दिले आहे, या बद्दल एस.पी.साहेबांचे अभिनदंन.

- सर्व आरोपी वाशी तालुक्यातील खामकरवाडी येथील रहिवासी
- एक दरोडा व तीन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस

यासंदर्भात सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.४ डिसेंबर २०२५ रोजी गेवराई तालुक्यातील धुळे-सोलापूर महामार्गावरील वडगाव ढोक येथे रस्त्यावर अडथळा टाकून बाहेर राज्यातील प्रवाशांची गाडी अडवण्यात तसे आरोपींनी वाहनातील प्रवाशांना मारहाण करून त्यांच्याकडील सोन्याचे दागिने व रोख रक्कम बळजबरीने चोरून नेली होती. याप्रकरणी पोलीस अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी बीड शहरातील संभाजी महाराज चौक परिसरात चालक झोपलेला असताना वाहनाची काच फोडून प्रवाशांना मारहाण करत सोने-चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे गु.र.नं. ३१६/२०२५ दाखल होता.याशिवाय २० नोव्हेंबर २०२५ रोजी हॉटेल दुबई समोर पार्क केलेल्या वाहनातील प्रवाशांना शस्त्राचा धाक दाखवून मौल्यवान वस्तू लंपास करण्यात आल्या होत्या यांचा गु.र.नं. ४०२/२०२५ तसेच ९ नोव्हेंबर २०२५ रोजी धनवडे



वस्ती, पाली येथे वाहन अडवून रोख रक्कम हिसकावून नेल्याची घटना घडली होती याबाबतगु.र.नं. ४१७/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. बीड जिल्ह्यातच नव्हे तर या राष्ट्रीय महामार्गावर बीड ते तुळजापूर दरम्यान रोड रॉबरीचे गुन्हे सतत घडत होते जेथे गुन्हे घडत होते ती ठिकाणे धोक्याची ठिकाणे म्हणून देखील पोलिसांनी घोषित केलेली ती व सावधानतेचा इशारा दिला होता.

यातच महामार्गावरील वाढत्या जबरी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक स्थापन करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या नेतृत्वा खाली पथक कार्यरत होते.दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींची माहिती पान २ वर

## लहान मुले पळवून नेणारी टोळी कार्यरत?

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. आज अधिवेशनाचा सहावा दिवस आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे.



राज्यात लहान मुले पळवून नेणारी टोळी कार्यरत आहे, तसेच तरुण मुली देखील गायब होत आहेत, हा विषय अत्यंत गंभीर असून यावर विधिमंडळात चर्चा व्हावी अशी मागणी राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवरून पोस्ट करत केली आहे.

एका अत्यंत महत्त्वाच्या आणि गंभीर विषयाकडे तुमचं लक्ष वेधून घेण्यासाठी हे लिहीत आहे. महाराष्ट्रात लहान मुलं पळवण्याचं, ती बेपत्ता होण्याचं प्रमाण वाढत आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार जरी गेलं तरी हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३० टक्क्यांनी वाढलं आहे. लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणा-या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. आणि या टोळ्या सर्रास लहान मुले पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही. पान २ वर

## बीड जिल्ह्यातून जाणार आणखी एक महामार्ग

### केंद्रीय मंत्री गडकरींची घोषणा

### बीडचा आर्थिक विकास वेगाने होणार

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- महाराष्ट्राच्या दळणवळण व्यवस्थेला आमुलाग्र बदल करुन आणणारी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. पुणे आणि छत्रपती संभाजी नगर या दोन महत्वाच्या शहरांना जोडणारा अत्याधुनिक महामार्ग उभारण्यात येणार आहे. संपूर्णपणे नवीन आणि नियोजीत ग्रीन फिल्ड मार्ग या प्रकल्पाचा दुसरा आणि महत्वाचा टप्पा असणार आहे.



शिकरापासून सुरु होणारा ग्रीन फिल्ड हायवे हा महामार्ग अहिल्यानगर जिल्ह्याच्या बाहेरुन थेट बीड जिल्ह्यता प्रवेश करेल आणि पुढे संभाजी नगरशी जोडला जाईल. या महामार्गासाठी १६ हजार ३१८ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली असून अहिल्यानगर, बीड, संभाजी नगर आणि नागपूर या भागांचा आर्थिक विकास वेगाने होईल असा विश्वास नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे.

या प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देताना नितीन गडकरी म्हणाले की, पुणे ते संभाजीनगर या मार्गासाठी नवीन एक्स्प्रेस हायवे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एमओयू आधीच झालेला असून, पहिल्या टप्प्यात पुणे, अहिल्यानगर आणि संभाजीनगर असा मार्ग विकसित केला जाणार आहे. या मार्गावरील सध्याचा रस्ता पूर्णपणे दर्जेदार करण्यात येणार असून, वाहतुकीचा वेग आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. या मार्गावर काही ठिकाणी पूल उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा स्वतंत्र खर्च करण्यात येणार आहे. या कामामुळे वाहतुकीतील अडथळे दूर होऊन प्रवास अधिक सुलभ होणार आहे. या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर पुणेसंभाजीनगर मार्गावर वाहनचालकांना अधिक वेगवान आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळणार पान २ वर

## पतीच्या नातेवाईकाविरुद्ध आष्टी न्यायालयात दाखल फौजदारी गुन्हा उच्च न्यायालयात रद्द

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- आष्टी येथील न्यायालयात पतीच्या नातेवाईकाविरुद्ध दाखल ४९८ अ हा फौजदारी गुन्हा उच्च न्यायालयात रद्द झाला आहे.

सविस्तर माहिती अशी की, आष्टी येथील एका महिलेने तिचे पती व इतर नातेवाईक सासू-सासरे दीर भावजय, नणंद व पुतणे यांच्या विरोधामध्ये लग्नानंतर २८ वर्षे संसार केल्यानंतर पती व सासू-सासरे व इतर नातेवाईक यांनी विनाकारण मारहाण करून घराबाहेर हाकलून दिले तसेच सासू-सासरे व इतर नातेवाईक यांनी माहेरून १ लाख रुपये घेऊन ये नसता व्यवस्थित नांदवणार नाही, तसेच पती दारू पिऊन येऊन सतत लाथा बुक्क्याने मारहाण करतात अशी प्रथम खबर ३३८ दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी आष्टी पोलीस स्टेशन येथे दिली होती. सदरील प्रकरणात पोलिसांनी तपास करून दोषारोप पत्र दाखल केले होते. परंतु सदरील प्रकरणात पती व पतीचे नातेवाईक यांनी राजाभाऊ शंकर भडके, शंकर बालाजी भडके गुणाबाई उर्फ पार्वती शंकर भडके, बिबीशन शंकर भडके, चंद्रकला आप्पासाहेब धनगावकर, दीपक आप्पासाहेब धनगावकर, अक्षय बिभीषण भडके, कविता बिभीषण भडके यांनी माननीय उच्च न्यायालय खंडपीठांमध्ये फौजदारी याचिका क्रमांक १११७/२०२३ ॲड.एन.एल. जाधव यांच्यातर्फे दाखल केली होती. सदरील याचिकेमध्ये पत्नी हिने २८ वर्षे संसार केल्यानंतर पती व पतीच्या नातेवाईकाविरोधात खोटी व मनघडण आरोप करून तक्रार नोंदवली असून सदरील तक्रारीमध्ये मुख्य आरोप पतीच्या विरोधात केले असून सासू सासरे, नणंद, जाऊ, दीर, पुतणे यांच्या विरोधामध्ये संदिग्ध आरोप केले असून महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायद्याखाली पत्नीने दाखल केलेली केस खारीज झाली असून त्या अनुषंगाने आलेल्या पुराव्यामध्ये पत्नी हिने आरोपी क्रमांक दोन व चार हे वेगळे राहत असून सदरील तक्रार व दोषारोपपत्र यांचे अवलोकन पान २ वर

## २१ डिसेंबरपर्यंत मिळणार लाडकीचा हप्ता?

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- नोव्हेंबर महिना उलटला आता डिसेंबरचा अर्धा महिना होवून गेला तरीही अजून लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना एकही हप्ता मिळाला नाही. लाभार्थी महिला या नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या हप्त्याची वाट पाहत आहेत. हे दोन्ही हप्ते एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे.



दरम्यान, येत्या ७ दिवसात महिलांच्या खात्यात ३००० रुपये येऊ शकतात.

लाडकी बहीण योजनेत लाभार्थ्यांचा दोन महिन्यांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबरचे पैशे एकत्र येऊ शकतात. २१ डिसेंबरआधी पैसे येण्याची शक्यता आहे. २० डिसेंबर रोजी २० नगरपरिषद निवडणुकांसाठी मतदान आहे. यानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीआधी महिलांच्या खात्यात पैसे येण्याची शक्यता आहे. पान २ वर

## पंतप्रधानपदी मराठी माणूस विराजमान होईल

## १९ डिसेंबरला देशात राजकीय भूकंप

### अमेरिकेचा हवाला देत पृथ्वीराज चव्हाणांचा दावा



पुणे दि.१३ (प्रतिनिधी):- येत्या १९ डिसेंबरला देशाच्या राजकारणात मोठी घडामोड घडणार आहे. अमेरिकेतील एका इस्त्रायली गुप्तहेराने केलेल्या स्टिंग ऑपरेशनची माहिती बाहेर येणार असून, त्यामुळे अनेक बडे नेते अडचणीत येण्याची शक्यता आहे. या वादळात कदाचित भारताचा पंतप्रधान बदलून त्या जागी एखादा 'मराठी माणूस' पंतप्रधानपदी विराजमान होऊ शकतो, असा खळबळजनक दावा राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. त्यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात एकच चर्चा रंगली आहे.

पिंपरी-चिंचवड येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात चव्हाण बोलत होते. यावेळी त्यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर 'मराठी माणूस देशाचा पंतप्रधान पान २ वर

## एलआयसी बीड शाखेचा सातबारा विक्रम

## एका दिवसात ५१५ पॉलिसींची ऐतिहासिक कामगिरी



बीड दि.१२ (प्रतिनिधी):- एलआयसी बीड शाखेने सातबारा उपक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत संभाजीनगर विभागात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ७डिसेंबर २०२५ (सातबारा) रोजी बीड शाखेतील सर्व एजंट बांधवांनी १००१ पॉलिसी पूर्ण करण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार एजंट, विकास अधिकारी, कर्मचारी व शाखाधिकारी यांनी एकदिलाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करत ८ डिसेंबर २०२५ रोजी एका दिवसात तब्बल ५१५ पॉलिसी पूर्ण केल्या.

चालू आर्थिक वर्षात संभाजीनगर विभागामध्ये एका दिवसात ५०० हून अधिक पॉलिसी पूर्ण करणारी बीड शाखा ही पहिलीच शाखा ठरली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बीड शाखेतील सर्व सदस्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यासाठी संभाजीनगर विभागाचे वरिष्ठ मंडल प्रबंधक पान २ वर

## बंजारा आणि धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्या –आ.विजयसिंह पंडित

### बंजारा आणि धनगर समाजाच्या आरक्षणाची विधानभवनात केली मागणी



गेवराई, दि.१३ (प्रतिनिधी) :- मराठवाड्यातील बंजारा (लमाण) समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटनुसार अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात तसेच धनगर समाजालाही एसटी प्रवर्गात आरक्षण देण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी आज विधानभवनात केली. अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी बंजारा आणि धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर आवाज उठवला. गेल्या अनेक दिवसांपासून बंजारा आणि धगनर समाज पान २ वर

छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध व अनुभवी श्वसन विकार तज्ञ डॉक्टर
आता आपल्या माजलगाव शहरामध्ये
दि.१४ डिसेंबर २०२५ रविवार रोजी रुग्ण तपासणीसाठी उपलब्ध
वेळ : 11 ते 2 पर्यंत
डॉ.नितीन चित्ते
M.B.B.S., DNB Chest Medicine, EDARM (Europe)
तर आजच रुग्णांनी तपासणी व उपचारासाठी संपर्क करावा
स्थळ : डॉ.ज्ञानेश्वर गिलबीले यांचे
संजिवनी हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर
राजे छत्रपती महाराज चौक, मंगल मैदान समोर, बायपास रोड, माजलगाव.
संपर्क व नाव नोंदणी : 8956890251 8806444434
16421

प्लॉट विक्री करणे आहे
कॅनॉल रोड, स्व.विनायकराव मेटे मार्ग, सोळंकेंच्या बंगल्याच्या बाजुला, सिद्धीविनायक पार्क, लेन नं.1 मधील सर्व्हेनं.97 मधील, प्लॉट नं.53, पश्चिम मुखी 40 x 40 = 1600 स्केअर फुट प्लॉट विक्री करणे आहे.
:: संपर्क ::
9130103103
7083100700
16418-13390

पाहिजे
हॉटेल जय महाराष्ट्र बीड
करिता होतकरु वेटर, कामगार पाहिजे आहे.
योग्य पगार, जेवण दिले जाईल.
:: संपर्क वेळ : 11 ते 4
Mo.8975774999

प्लॉट विकणे आहे
टवाणी कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस नितीन ठाकुर यांचे घराजवळ राष्ट्रीय महामार्गापासुन फक्त १०० ते १२५ मीटर अंतरावर मंजरथ रोड माजलगांव येथे असलेला व कलेक्टर एन.ए. झालेला प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे. गरजुंनी खालील नंबरवर संपर्क करावा.
:: संपर्क मो.नं. ::
9423168649 9404214525

## शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांना पितृशोक

## शंकरराव फपाळ यांचे निधन

माजलगाव दि.१३ (प्रतिनिधी):- माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांचे वडील शंकरराव गणपतराव फपाळ यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने शनिवार दिनांक १३ रोजी सायंकाळी सात वाजता दुःखद निधन झाले. ते अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते. पान २ वर



## बीडमध्ये आज गणेश महाराज बांगर यांचे कीर्तन

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- बीड शहरातील नगर रोड भागातील माऊलीनगर येथे श्रीसंत भगवानबाबा, वै.वामनभाऊ, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री हनुमान मूर्ती प्राण प्रतिष्ठापना निमीत्त अखंड हरीनाम सप्ताह सुरु आहे.



या सप्ताहात दैनिक कार्यक्रमाबरोबरच दुपारी २.०० ते ४.०० रामायण, सायंकाळी ५.०० ते सकाळी ६.०० हरिपाठ, रात्री ८.०० ते १०.०० पान २ वर

## अट्टल महाविद्यालयाच्या सचिन मोहिते व धनंजय चव्हाणची योगासन स्पर्धेसाठी निवड

गेवराई, दि. १३ (प्रतिनिधी)- येथील र. भ. अट्टल महाविद्यालयातील सचिन मोहिते आणि धनंजय चव्हाण यांची वेल्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पल्लवरम चेन्नई येथे होणाऱ्या ऑल इंडिया योगासन स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संघात निवड झाली आहे. या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, उपप्राचार्य डॉ. विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रबंधक भास्कर सुरवसे, प्रा. अरुण भराडे, अमर गावडे, सुदर्शन निकम, डॉ. रवींद्र खरात व क्रीडा प्रशिक्षक अमित फुलारे आदींनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खेळाडूंच्या या यशाबद्दल त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पार्श्वभूमी

## विनायक प्राथ.व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रदर्शन व वृक्षारोपण संपन्न

बीड दि १२ (प्रतिनिधी)- शहरातील पेठ बीड भागातील विनायक प्राथमिक माध्यमिक ,उच्च माध्यमिक विद्यालय येथे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विज्ञान प्रदर्शन व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशासक डॉ.राजा मचाले हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्यवाहक राऊत,एम ,ए सर,कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड सर, संपादक शेख कामरान,उपसंपादक शेख फरहान,तारेख शेख जमा,काझी महंमद जफर,मुख्याध्यापिका श्रीमती कीर्तीताई पांगारकर ,मुख्याध्यापक तथा प्राचार्य रियाज बेग सर श्रीमती भारती ताई क्षीरसागर हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे उपमुख्यद्यापक माणिक अनुसे सर यांनी केले .

## मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठीही आ.विजयसिंह पंडित यांनी विधानभवनात उठवला आवाज

**गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) :- गेवराई विधानसभा मतदार संघात झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कापूस पिक बागायती पिकाच्या वर्गवारीचे सर्व निकष पूर्ण करत असल्यामुळे कापूस शेतीचा बागायती शेतीमध्ये समावेश करून बागायती वर्गवारी प्रमाणे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधान भवनात अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना केली तसेच अतिवृष्टीमुळे गेवराई विधानसभा मतदार संघासह बीड जिल्ह्यातील सिंचन तलाव, पाझर तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरलेले असून याचा लाभ मत्स्य व्यवसाय विकासासाठी होऊ शकतो. त्यामुळे शासनाने मत्स्यबीज रोपन करण्याची मोहिम जिल्हा स्तरावर राबवावी अशी मागणीही यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.**

नागपूर मेथे सुरु असलेल्मा हिवाशी अधिवेशनात आ.विजमसिंह पंडित मांनी अंतिम आठवड्याच्मा प्रस्तावावर बोलताना आज कापूस उत्पादक शेतकरी आणि मत्स्म व्मवसाम मा मुद्यावर सविस्तर चर्चा करून बागामतीच्मा निकषाप्रमाणे कापूस उत्पादक शेतकऱ्मांनाही आर्थिक मदत करण्माची मागणी त्मांनी मावेळी केली. मावेळी बोलताना ते म्हणाले की, मराठवाड्यात सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्मात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्माने शेतकऱ्मांचे प्रचंड नुकसान झाले, अशा परिस्थिती महामुतीचे सरकार शेतकऱ्मांच्मा पाठिशी खंबीरपणे उभे राहिले. ऐन दिपावलीच्मा तोंडावर ३१६२८ कोटी रुपमांचे पॅकेज जाहिर करून शेतकऱ्मांना आधार देण्माचे काम केले. परंतु कधीही न भरून मेणारे नुकसान मराठवाड्यात झालेले आहे, गेवराई विधानसभा मतदार संघात १ लाख ४० हजार हेक्टरवर कापसाचे पिक घेतले जाते, सगळ्मात जास्त फटका कापूस मा पिकाला बसला आहे. कापूस पिक हे बागामती पिकाचे सर्व निकष पुर्ण करत असले तरीपण कापसाला बागामतीच्मा पिकात समाविष्ट करण्मात आले नाही. जिरामती क्षेत्रामध्मे समावेश करून कापूस उत्पादक शेतकऱ्माला अल्प मदत दिली जाते हे दुर्दैवी आहे. आपण मुख्ममंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्ममंत्री ना. अजितदादा पवार मांना पत्र देवून कापूस मा पिकाचा बागामतीमध्मे समावेश करून



घेण्माची मागणी केली होती. त्मावर चर्चाही झाली, बागामती प्रमाणे कापसालाही नुकसान भरपाई करण्माचा निर्णमही झाला पण आजपावेतो त्मासंदर्भातील आदेश निघालेला नाही. त्मामुळे माचाही विचार करून झालेल्मा निर्णमाच्मा आधारे शेतकऱ्मांना भरघोस आर्थिक मदत करण्माची मागणी आ. विजमसिंह पंडित मांनी केली.

मत्स्यबीज रोपन करण्याची मोहिम राबवावी आ. विजयसिंह पंडित

विधान भवनात अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावर बोलताना आ. विजयसिंह पंडित यांनी मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी आवाज उठवला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, यावर्षी मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गेवराई विधानसभा मतदार संघासह मराठवाड्यातील प्रमुख जलाशय, उपसा सिंचन तलाव तसेच बंधारे पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. त्यामुळे या जलाशयात मत्स्यबीज तसेच झिंगाबीज संचयन करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यातूनच बीड जिल्ह्यात मत्स्य व्यवसायाच्या विकासाला चालना मिळेल. मराठवाडा प्रदेश जलसंपन्न असला तरी मत्स्य व्यवसायाच्या दृष्टीने योग्य नियोजन आणि संचयन न झाल्यामुळे स्थानिक मच्छिमार समाज तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला अपेक्षित लाभ मिळत नाही. मत्स्यबीज आणि झिंगाबीज संचयन केल्यास ग्रामीण युवकांना, स्थानिक सहकारी संस्थांना उत्पन्न वाढीस प्रोत्साहन मिळेल तसेच मच्छिमार समाजाला रोजगारही मिळेल. त्यासाठी मराठवाड्यातील सर्व जलाशयात नियोजनबध्द पध्दतीने मत्स्यबीज व झिंगाबीज संचयन करण्याची कार्यवाही करावी. जिल्हानिहाय मत्स्य विभागाच्या देखरेखी खाली संचयनाची अंमलबजावणी करावी तसेच स्थानिक सहकारी संस्था व मत्स्य व्यवसायिकांना प्राधान्य द्यावे अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## प्रकाश आंबेडकर म्हणाले, आता येत्या २ महिन्यात एकनाथ शिंदे पुन्हा सीएम होतील असे वाटतेय

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीत सगळे काही आलबेल नसल्याचे दावे केले जात होते. अनेक ठिकाणी महायुतीतील घटक पक्ष एकमेकांविरोधात लढले होते. भाजपा आणि शिवेसना शिंदे गटाचे नेते एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप करत होते. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट दिल्ली गाठत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. यानंतर महापालिका निवडणुका भाजपा आणि शिंदे गटाने महापालिका निवडणूक एकत्र लढण्याबाबत चर्चा केली. यातच आता येत्या दोन महिन्यात एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होतील, असे वाटत असल्याचा मोठा दावा करण्यात आला आहे.



एकनाथ शिंदे यांनी पुन्हा स्वतःची पॉवर काय आहे हे दाखवून दिले आहे. आगामी राज्यभरातील महापालिका आम्ही वेगळे लढणार असे भाजपा सांगत होती, पण आता त्यांना माघार घ्यावी लागणार आहे. युती करून लढू असे ते आता म्हणत आहेत. एकनाथ शिंदे हे अमित शाह यांना भेटले. एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांना खिशात घातले आहे. ही त्यांची किमया आहे. त्यामुळे आता सर्व महापालिकांच्या निवडणुका शिवसेना शिंदे गट आणि भाजपा एकत्र लढणार आहेत. विधानसभेची निवडणूक झाली आणि एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले नाही, त्याचा हा बदला असावा असं त्यावरून दिसत आहे. एकनाथ शिंदे येत्या महिना दोन महिन्यात पुन्हा मुख्यमंत्री होतील असे वाटत आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

शरद पवार चाणक्य आहेत. काही काळापूर्वी शरद पवार आणि एकनाथ शिंदे यांची बैठक झाली आणि एकनाथ शिंदे यांनी योग्य संदेश दिला. मला हे आणि असेच दिसत आहे की, एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्यासारख्या माणसाला खिशात घातले आहे, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले. तसेच खेळ आता सुरू झाला आहे. अजून काही होणार का हे पाहू आणि मग कुठे जायचे ते ठरवू, असे सूचक विधान प्रकाश आंबेडकर यांनी केले.

दरम्यान, युती करूनच महापालिका निवडणुका आम्ही लढणार आहोत.



नगरपालिका निवडणुकीत आम्ही युती करून लढलो आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही आम्ही युती करू, असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले. तसेच संख्या नाही, म्हणून विरोधी पद दिले गेले नाही.

भाजपाने औचित्य दाखवायला हवे होत की, सिंगल लार्जेस्ट पार्टीचा अध्यक्ष द्यायला हवा होता. सगळ्यांनी बसून एक नाव सुचवायला हवे होते पण तसे झाले नाही. दुर्दैवाने त्यांना म्हणजे भाजपाला अस करायचे नव्हते, असा आरोप आंबेडकर यांनी केला.

## राज्य नाट्य स्पर्धेत सात बक्षीस घेऊन उत्क्रांत नाटकाने केला विक्रम

बीड दि १३ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने संभाजीनगर आणि बीड या संयुक्त केंद्रावर आयोजित राज्य नाट्यस्पर्धेत पहिल्या क्रमांकाची ३ व अन्य ४ अशी ७ बक्षीस घेऊन उत्क्रांत नाटकाने विक्रम केला. या नाटकाने प्रकाश योजना, नेपथ्य व वेशभूषेसाठी अशी तीन पहिली बक्षीसे पटकावली तर दिग्दर्शन, रंगभूषा व संगीत संयोजनालाही तिसरे बक्षीस मिळाले तर नाटक ही तिसरे बक्षीस घेऊन नंबरात आले. मात्र इतके बक्षीस घेऊनही नाटक अंतिम फेरीत न गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. उत्क्रांत नाटक समकालीन पार्श्वभूमीवर रेखाटलेले असून वर्चस्वासाठी हिंसा व सत्तेसाठी नितीमुल्यांचा ऱ्हास या मूलभूत विषयावर प्रसिद्ध नाटककार डॉ. सतीश साळुंके यांनी लिहिले आहे. जालना येथील सुंदरेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने ते संभाजीनगर केंद्रावर सादर केले होते. त्याचे दिग्दर्शन विनायक पाटील यांनी केले. सिद्धार्थ थोरात यांच्या अप्रतिम अभिनयाने नाटक उंचीवर गेले. नाटकास प्रकाश योजनेसाठी वाल्मीक जाधव -प्रथम नेपथ्यासाठी रामेश्वर देवरे-प्रथम वेशभूषा साठी कविता दिवेकर -प्रथम दिग्दर्शन विनायक पाटील -तृतीय संगीत योजना सौरभ मांडवकर- तृतीय तर रंगभूषेसाठी कविता दिवेकर यांनी तृतीय बक्षीस पटकावली. सर्व यशस्वी कलावंतांचे सांस्कृतिक विभागाचे संचालक विभीषण चवरे व लेखक डॉ. सतीश साळुंके यांनी अभिनंदन केले.

## तहसीलदारांच्या बनावट सही प्रकरणी अखेर तत्कालीन नायब तहसीलदारविरुद्ध गुन्हा दाखल

केज दि १३ (प्रतिनिधी) केज तहसीलदारांच्या बनावट सह्या करून अर्धन्यायिक प्रकरणाचा आदेश पारित केल्याप्रकरणी तत्कालीन नायब तहसीलदार आशा वाघ-गायकवाड यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र जमीन महसूलअधिनियम १९६६ च्या कलम १५५ अंतर्गत अर्धन्यायिक अधिकार केवळ तहसीलदारांकडे असतात. मात्र संबंधित प्रकरणात तत्कालीन नायब तहसीलदारांनी तहसीलदारांचे अधिकार स्वतःहून वापरून आदेश दिल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. त्या सोबतच आदेशावर तहसीलदारांच्या नावाने बनावट स्वाक्षरी करून ती ग्राम महसूल कार्यालय तसेच तलाठीकार्यालयास पाठविल्याचेही चौकशीत स्पष्ट झाले. ही बाब उघड झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने सखोल तपासाचे आदेश दिले. तपासात आदेशा तील सहीबनावट असल्याची पुष्टी झाली असून आदेश पारित करण्याची प्रक्रिया पूर्णतः बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचेही निष्पन्नझाले. या बनावट आदेशामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल झाली तसेच महसूल अधिकारी व तलाठी यांच्या कामकाजावरही प्रतिकूल परिणाम झाल्याचे समोर आले आहे. सदरील प्रकरणात फसवणूक, सरकारी कागदपत्रांची बनावट निर्मिती, पदाचा गैरवापर अशा अनेक गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवली जाण्याची शक्यता असून या प्रकरणामुळे केवळ केज तालुकाच नव्हे तर छत्रपती संभाजीनगर महसूल विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातही खळबळ उडालीआहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यामुळे महसूलविभागा तील अधिकाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रिया अधिक कडक करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. स्थानिक पातळीवर या प्रकरणाची जोरदार चर्चा असून संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची जनतेतून मागणी होत आहे.

## बसच्या धडकेत मृत्यू पावलेल्या विश्वास बागलाने यांच्या कुटुंबियांची घेतली गणेश उगले यांनी सांत्वनपर भेट

बीड दि १३(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील काकडहिरा येथील शेतकरी कुटुंबातील श्री शिवाजीराव मामा बागलाने यांचा ४० वर्षे वयाचा मुलगा विश्वास उर्फ राजाभाऊ शिवाजीराव बागलाने यांस बीड अहिल्यानगर हायवेवर काकडहिरा गावा नजीक एसटी बसची धडक बसून त्याचे अपघाती निधन झाले. तसे शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले यांनी काकडे जाऊन विश्वास बागलाने यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले व मदतीचा हात दिला. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून जास्तीत जास्त शासकीय मदत या कुटुंबाला मिळवून देण्याचा माझा प्रयत्न करू असा कौटुंबिक आधाराचा शब्द गणेश बप्पा यांनी बागलाने कुटुंबीयांना दिला. दिवंगत विश्वास यांच्या पश्चात आई वडील भाऊ बहिणी मेहुणे बीएससी सेकंड ईयर शिकत असलेला मुलगा अभिजीत, बारावी शिकत असलेली मुलगी अर्पिता व सातवी शिकत असलेला मुलगा अथर्व व पत्नी असा परिवार आहे. आपली थोडीशी जमीन व दुधाचा व्यवसाय करून विश्वास हे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. जिल्हा शिवसेनेच्या वतीने या कुटुंबाला मदतीचा हात म्हणून दिवंगत विश्वास यांचा सातवीत शिकत असलेला मुलगा आपण पुढील त्याच्या शिक्षणासाठी शिक्षणाच्या त्याच्या शाळेच्या व क्लासेसच्या सर्व फीचा खर्च उचलण्याचा शब्द यावेळी गणेश बप्पा उगले यांनी कुटुंबीयांना दिला. यावेळी समवेत असलेले अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष श्री हरिदास घोगरे सर, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री सुनील कुर्लेकर सर, गवळवाडी गावचे ज्येष्ठ नेते अनुरथ भाऊ मस्के, रामा वायभट यांच्यासह गावचे उपसरपंच विशाल बागलाने, बळी मामा बागलाने,ग्रामपंचायत सदस्य प्रकाश मामा बागलाने, ग्रामपंचायत सदस्य उद्धवराव बागलाने, निलेश शिवाजीराव बागलाने, संभाजी बागलाने, गोवर्धन बागलाने, दत्ता बागलाने, तीपाले हिरापूर, फुलचंद कदम येळम घाट हे उपस्थित होते.

## प्राथमिक निवासी आश्रम शाळा,टाकळी येथे स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी

चिंचोली माळी दि १३ (प्रतिनिधी)- येथून जवळच असलेल्या व केज तालुक्यातील मौजे टाकळी येथील प्राथमिक निवासी आश्रम शाळा येथे दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सुरुवातीस संस्थेचे सचिव श्रीमती काशीबाई नारायण घुले यांचे हस्ते मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कु. साक्षी घुले, चि. ओमकार मुंडे, चि. तेजस आंधळे, चि. प्रविण चौरे या विद्यार्थ्यांनी प्रभावी आणि मनोगते सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांच्या मनोगतांमध्ये मुंडेसाहेबांचे साधेपण, जनसेवा आणि नेतृत्वगुण यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष शंकर घुले, शाळेचे मुख्याध्यापक घुले ए.एन.सर, तसेच श्रीकांत घुले सर यांच्या सह शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी मुंडे साहेबांच्या प्रेरणादायी कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या आदर्शातून मार्गदर्शन करण्याचा संदेश दिला.

## आदर्श विद्यालय बनसारोळाची शैक्षणिक सहल उत्साहात परत

बनसारोळा दि १३(प्रतिनिधी)- केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श विद्यालयाची शैक्षणिक सहल दिनांक ६ ते ११ डिसेंबर २०२५ यादरम्यान सहल उत्साहात पार पडली.या सहलीमध्ये सहभागी एकूण १२० विद्यार्थी,१२ शिक्षक आणि २ शिक्षकेतर कर्मचारी यांनी तुळजापूर, आळंदी, देहू, लोणावळा, पाली, मुरुड.-जंजिरा, अलिबाग बीच, हरिहरेश्वर, रायगड, प्रतापगड आणि महाबळेश्वर याठिकाणी भेटी दिल्याने विद्यार्थ्यांना ज्ञान,निरीक्षण शक्ती आणि इतिहास -भूगोला विषयीची समज अधिक दृढ झाली.या संपूर्ण सहलीचे नेतृत्व साळुंके सर यांनी उत्कृष्टपणे केले.त्यांना प्रमोद मोरे,संतोष रोकडे, शिवाजी मांदळे,सुरज लोखंडे,जगन्नाथ काळे, मोरे मॅडम,येडले मॅडम, सरवदे मॅडम,यादव मॅडम, नरके मॅडम तसेच बाळासाहेब काकडे आणि गिरीधर जोगी यांचेमोलाचे सहकार्य लाभले.तर ही शैक्षणिक सहल यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे,सचिव बालासाहेब काकडे आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## मराठी पत्रकार परिषदेच्या आजच्या राज्यस्तरीय बैठकीला बहुसंख्येने उपस्थित रहा - दिनकर शिंदे

गेवराई दि १३( प्रतिनिधी) -अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या विस्तारित कार्यकारणीची बैठक, बीड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी देवडी येथे होणार आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.



वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत होत असलेल्या या कार्यक्रमास अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, पत्रकार विशाल परदेशी, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे आदींसह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ ते १ पर्यंत पुरस्कार वितरण सोहळा आणि दुपारी २ वाजता परिषदेची बैठक होणार आहे. या सोहळ्यास बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांसह पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

## देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनामुळे मार्गदर्शकाला मुकलोत- राजकिशोर मोदी

अंबाजोगाईदि १३ (प्रतिनिधी)-काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवार १२ डिसेंबर रोजी सकाळी निधन झाले आहे. ते ९१ वर्षांचे होते. लातूरच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिलेले चाकूरकर यांनी लातूरचे नगराध्यक्ष ते भारताचे गृहमंत्री असा राजकीय प्रवास केला होता. त्यांच्या निधनामुळे देशाचे, राज्याचे तसेच मराठवाड्याचे अपरिमित असे नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनामुळे उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मराठवाडा मुकला आहे. अशा शब्दांत अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी आपल्या सहवेदना, शोकभावना व्यक्त करीत आदरांजली वाहिली.आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राजकिशोर मोदी यांनी सांगितले आहे की, मागील काही दिवसांपासून शिवराज पाटील चाकूरकर यांची प्रकृती ठीक नव्हती. ते देशासह राज्यातील एक अनुभवी नेते होते. त्यांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनात आमदार, खासदार, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, राज्यपाल तसेच लोकसभेचे अध्यक्ष म्हणून लक्षवेधी आणि उल्लेखनीय कार्य केले आहे. चाकुरकर हे महाराष्ट्राच्या राजकीय सुसंस्कृततेचा वारसा जपणारे सर्वपरिचित व्यक्तिमत्व होते. त्यांना देशाच्या राजकारणात आदराचे स्थान होते. त्यांच्या निधनामुळे राजकारण-समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला आपण मुकलो आहोत. असे नमूद करून राजकिशोर मोदी यांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली..

## शिक्षक संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने जीवन बागलाने सत्कारित

बीड दि १३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षकसंघाच्या जिल्हाकार्याध्यक्षपदी जिवन बागलाने यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा मित्रपरिवार कडून सत्कार करण्यात आला.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस युवकचे जिल्हाध्यक्ष बळी आप्पा गवते , सागर बहिर ,अजिंक्य पवळ , कोठुळे, मस्के,रोहित गुजर ,महाराष्ट्र शिक्षक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्रीराम आण्णा बहिर , प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान आबा पवार ,आखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सूनिल कुर्लेकर ,श्री छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विजय आप्पा खोसे , वडवणी शिक्षक पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन शामराव मुळे ,माजी उपाध्यक्ष जितेंद्र पोथरकर ,आखिलचे कार्याध्यक्ष विलास आहेर , नितीन बागलाने, सुधाकर घोडके, अभिजीत देवमाने, नितीन आगे, महेश मोटे सर, बिभिषण हावळे सर, जिवन हाडूले सर, शिवाजी जगताप , अशोक भांगे , मोतवार सर , आदी मान्यवर तसेच शिक्षक संघाचे पदाधिकारी व मित्र परिवार उपस्थित होता. या सर्वांनी जीवन बागलाने यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या

## सावरगाव येथे स्व.गोपिनाथराव मुंडे साहेब यांची जयंती साजरी

कोळगाव, दि.१३ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील सावरगाव येथे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांची जयंती दि.१२ डिसेंबर रोजी साजरी करण्यात आली.

बीड जिल्ह्याचे भुमि पुत्र असलेले गोपिनाथराव मुंडेसाहेब यांनी आपल्या जीवनात संघर्ष करून सत्तेच्या दिशेने आगेकूच करुन दिल्लीच्या सत्तेतील महत्वाचे केंद्रिय ग्रामविकास मंत्रीपद म्हणून शपथ घेतली. त्यांच्या किर्ती रूपाने आज ते अजरामर आहे. विरोधी पक्षात असतानाही एक वेगळा दरारा होता, सत्तेच्या विरोधात रस्त्यावर उतरून अन्यायाला वाचा फोडणारे, शेतकरी, शेत मजूर व अठरा पगड जातीचं नेतृत्व म्हणजेच मुंडेसाहेब होतेअसे सांगितले. यावेळी मादळमोही अर्बन बँकचे चेअरमन संदिप आंधळे, उपसरपंच अभिमान मिसाळ, वैजनाथ चव्हाण,आण्णाभाऊ जाधवर, दिनकर जाधवर, कृष्णा मिसाळ, रामभाऊ मिसाळ, वणवे, गव्हाणे, बाबासाहेब खाडे, गणेश इंगोले, कल्याण सतकर सर, शहादेव जिजा आंधळे, रामकिसन वणवे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांनी केले विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

केज दि १३ (प्रतिनिधी) तालुक्यातील साबला येथील आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आनंदवाडी वस्ती, साबला येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप केले.

विद्यार्थ्यांमध्ये आनंदाची भावना पसरवत काकडे यांनी आपला वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा केला. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व सहशिक्षक उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, गणेश कटारे, रामचंद्र राऊत, लखन राऊत यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यां कडून कौतुक करण्यात येत आहे. शालेय



विद्यार्थी व शिक्षकांनी नरहरी काकडे यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांना त्यांच्या दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. नरहरी काकडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

# संपादकीय

## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा. यांचा आज स्मृतिदिन. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

## श्रीधरराव नागापूरकर यांची निवड

नांदेड दि.१३(प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जुने व निष्ठावान कार्यकर्ते श्रीधरराव नागापूरकर यांची नांदेड शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या कार्यालयीन सरचिटणीस पदी निवड करण्यात आली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष वसंतनगर येथील कार्यालयात पत्रकार परिषदेत शहर कार्यकरणी जाहीर केली यामध्ये नागापूरकर यांची शहर जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली नागापूरकर हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सक्रिय निष्ठावान कार्यकर्ते आहेत त्यांनी राष्ट्रवादीत अनेक पदे भूषवली आहेत व प्रत्येक पदाला न्याय देत पक्षाचे काम करत आहेत.आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थिती ही निवड प्रक्रिया पार पडली नागापूरकर यांनी या पूर्वी राष्ट्रवादी युवक ग्रामीण च्या सरचिटणीस शहर राष्ट्रवादीत उपाध्यक्ष फोदर बॉडी मध्ये चिटणीस,प्रवक्ता,प्रसिद्धी प्रमुख व उद्योग विभागात जिल्हाध्यक्ष तसेच अजित पवारांची राष्ट्रवादी वेगळी झाल्यावर नागापूरकर यांच्याकडे उद्योग विभागाची मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदाची जवाबदारी वरिष्ठांनी सोपवली ती सार्थ ठरवत नागपूरकरांनी मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मराठवाड्यात संघटन वाढवून चांगले काम केले व उद्योग विभाच्या पदाच्या माध्यमातून अनेक व्यापाऱ्यांच्या समस्या नागपूरकरांनी सोडविल्या आज प्रसिद्ध झालेल्या कार्यकारणीत नागपूरकरांकडे आ.प्रताप पाटील चिखलीकर व शहर जिल्हाध्यक्ष माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा यांची कार्यालयीन सरचिटणीस पदाची जवाबदारी दिली असता ही जवाबदारी सुधा नागापूरकर हे आ.प्रताप पाटील चिखलीकर,माजी मंत्री माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर व शहर जिल्हाध्यक्ष माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम करतील अशी चर्चा कार्यकर्त्यांमध्ये होती.

# मृत्यूनंतरही सर्वसामान्यांना यातना ; वर्षभरात मृत्यू नोंदणीचे तब्बल १७ आदेश नाकारले

## घरी मृत्यू झाल्यानंतर पोस्टमार्टम रिपोर्ट कुठून आणायचा ? ; सर्वसामान्य नागरिकांचा सवाल

पाटोदा दि १३ (प्रतिनिधी)- जन्म-मृत्यू विलंब नोंदणीचे अधिकार न्यायालयाकडून महसूल विभागाकडे दिल्यापासून सर्वसामान्य नागरिकांच्या यातना प्रचंड वाढल्या आहेत. पूर्वी न्यायालयात प्रक्रिया कायदेशीर अधिष्ठानासह जलदगतीने पार पडत असताना, महसूल विभागाकडे अधिकार गेल्यापासून ग्रामीण भागातील नागरिकांना तहसील कार्यालयांची वारंवार पायपीट करावी लागत आहे. तांत्रिक कौशल्य, कायदेशीर प्रशिक्षण आणि तज्ञ मनुष्यबळाच्या अभावामुळे प्रकरणे महिनोनमहिने रखडत असून नागरिकांचे हाल अधिकच तीव्र झाले आहेत.

पाटोदा तालुक्यातील परिस्थिती विशेषतः गंभीर असून फक्त वर्षभरात मृत्यू नोंदणीसाठी आलेल्या अर्जांपैकी तब्बल १७ प्रकरणे प्रशासनाकडून नाकारली गेली आहेत, तर केवळ ५ आदेशच मंजूर झाले आहेत. त्यापैकीही काही मंजूर प्रकरणे आत्महत्येसारख्या गंभीर कारणांमुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाल्यानेच पारित झाली आहेत. बाकीच्या सर्वसामान्य नागरिकांना मात्र आवश्यक पुरावे उपलब्ध न झाल्याने अथवा प्रक्रिया न समजल्यामुळे आदेश नाकारले जात आहेत.शासनाने विलंब नोंदणीसाठी निश्चित केलेली कागदपत्रे नागरिकांना सहज उपलब्ध होत नाहीत. विशेषतः गरीब कुटुंबात मृत्यू झाल्यास पोस्टमार्टम रिपोर्ट कुठून आणायचा? कोणत्या कागदाची गरज आहे? प्रक्रिया कोणाकडे विचारावी? असे प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाले आहेत. तहसील कार्यालयात या प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्याने अर्जदारांना अपूर्ण माहिती, वारंवार फेऱ्या आणि प्रलंबित फाईल्स यांचा सामना करावा लागतो.महसूल विभागावर आधीच अतिवृष्टी नुकसानभरपाई, पिकविमा तक्रारी, पुरवठा विभागाची जबाबदारी, भूमापन, मालमत्ता वाद, विविध योजना यांसारखी कामे आहेत. त्यातच विलंब नोंदणीसारख्या अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीर बाबींचा अतिरिक्त बोजा दिल्याने प्रशासनिक ताण वाढला आहे. याचा थेट फटका ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. दरम्यान नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू असून, ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी पाटोदा तालुक्यातील नागरिकांकडून तीव्र होत आहे.

# चिंचगव्हाणमध्ये जलजीवन मिशनचे बोगस काम उघड

## बीड जिल्हा प्रभारी ॲड.अमोल डोंगरे यांची चौकशीची मागणी

माजलगांव दि.१३(प्रतिनिधी):- तालुक्यातील चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता व बोगस पद्धतीने काम केले जात असल्याचा गंभीर आरोप बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा प्रभारी ॲड. अमोल विलासराव डोंगरे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकारी, गटविकास कार्यालय माजलगाव यांना लिखित निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली.अड. अमोल डोंगरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, चिंचगव्हाण ग्रामपंचायतीत सुरू असलेले जलजीवन मिशनचे काम मंजूर अंदाजपत्रकानुसार न होता निकृष्ट दर्जाचे, बोगस आणि नियमबाह्य प्रकारे करण्यात येत आहे. या कामावर योग्य देखरेख नसल्याने सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.त्यांनी पुढे म्हटले आहे की, हे काम तात्काळ स्थगित करून स्वतंत्र चौकशी नेमावी. झालेल्या बोगस कामाची तपासणी करून ते पुन्हा मंजूर निकषांनुसार करण्यात यावे. तसेच दोषींवर कठोर कारवाई




करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.अन्यथा गटविकास कार्यालयासमोर जाहीर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अड. अमोल डोंगरे यांनी दिला आहे.

# सैन्यात भरती झाल्याबद्दल सुदाम पिंगळे श्री बंकट स्वामी कॉलेजमध्ये सत्कारीत



बीड दि १३ (प्रतिनिधी)-येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा विद्यार्थी पिंगळे सुदाम भारतीय सैन्यात भरती झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आर.एच. भोसले व सचिव सौ.सरोज गोपाळराव सोंडगे यांनी शुभेच्छा दिल्या .तसेच या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे, उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख कॅप्टन डॉ.जगन्नाथ चव्हाण यांनी पिंगळे सुदाम कोंडीराम याचा शाल श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. गरीब कुटुंबातील व टाळ - मृदुंग ची आवड असणारा एक वारकरी संप्रदायाच्या आश्रमात राहून शिक्षण घेणारा विद्यार्थी राष्ट्रीय छात्र सेना विभागात दाखल होऊन ते सेवेचे धडे घेतो आणि देश सेवेसाठी रुजू होत आहे. याचा गावकऱ्यांना तसाच महाविद्यालयाला विशेष आनंद होत आहे. असे मत व्यक्त केले.



माजलगाव -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माली पारगाव चे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा शहाजानपूर येथील रहिवासी रामराव मारोतराव डाके यांना अमृत महोत्सवानिमित्त शुभेच्छा देताना माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ व सुप्रसिद्ध निवेदक अशोक वाडेकर .

# ना.पंकजाताई मुंडेंनी शिवराज पाटील यांचे अंत्यदर्शन घेत कुटुंबीयांचं केलं सांत्वन

लातूर, दि १३ (प्रतिनिधी)- माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जाण्याने राजकारणातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व व राजकारणातील एक सात्विक नेता हरवला अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत. मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चाकूरकर कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्याचबरोबर शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, राजकारणातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व व राजकारणा तील एक सात्विक नेता आज हरवला आहे.शिवराज पाटील चाकूरकर हे आपल्या जीवनामध्ये सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले. देश पातळीपर्यंत अत्यंत सन्मानाने आणि स्वाभिमानाने सात्विक असं राजकारण त्यांनी केलं. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. त्यांच्या कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वर देवो अशा शब्दात ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे सानुग्रह योजनेत सर्पदंश मृत्यूला संरक्षण द्या-आ.सुरेश धस

## हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आ.सुरेश धस यांची ठाम भूमिका

पाटोदा दि १३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शुक्रवारी झालेल्या चर्चेदरम्यान आ. सुरेश धस यांनी शेतकऱ्यां च्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर ठोस आणि संवेदनशील भूमिका मांडत राज्य सरकारचे लक्ष वेधले. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करत, त्यांच्या नावाने सुरू असलेल्या गोपीनाथराव मुंडे शेतकरी सानुग्रह योजनेत अत्यावश्यक सुधारणा करण्याची ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली.सध्या या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू किंवा गंभीर अपंगत्वाच्या प्रकरणात आर्थिक सहाय्य दिले जाते. मात्र ग्रामीण भागात दरवर्षी अनेक शेतकरी, महिला शेतकरी भगिनी तसेच मजूर सर्पदंशामुळे मृत्युमुखी पडतात. असे असतानाही सर्पदंशामुळे झालेला मृत्यू या योजनेत स्पष्टपणे समाविष्ट नसल्याकडे आमदार धस यांनी सरकारचे विशेष लक्ष वेधले.शेतीकाम करताना, शेतात पहारा देताना किंवा ग्रामीण भागातील दैनंदिन जीवनात



सर्पदंशाचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. अशा दुर्घटनेत कुटुंबाचा कर्ता गमावल्यावर त्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळते. त्यामुळे शेतकरी किंवा महिला शेतकरी भगिनींचा सर्पदंशा मुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांनाही सानुग्रह अनुदानाचा तातडीने लाभ मिळावा, ही न्याय्य आणि काळाची गरज असल्याचे आमदार सुरेश धस यांनी स्पष्टपणे मांडले.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण समाजासाठी लढा दिला. त्यांच्या विचारांना आणि कार्याला खऱ्या अर्थाने न्याय द्यायचा असेल, तर त्यांच्या नावाच्या योजनेत सर्पदंश मृत्यूचा समावेश करून शेतकरी कुटुंबांना दिलासा देणे आवश्यक आहे, असे ठाम प्रतिपादन आमदार धस यांनी सभागृहात केले लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी शेतकऱ्यांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. आज त्यांच्या नावाने सुरू असलेल्या सानुग्रह योजनेत सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतकरी कुटुंबांना संरक्षण मिळत नसेल, तर ते अन्यायकारक आहे. सरकारने तातडीने निर्णय घेऊन सर्पदंश मृत्यूचा या योजनेत समावेश करावा, ही माझी ठाम मागणी असल्याचे आ.धस यांनी नमूद केले.

# विद्यार्थ्यांनी आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा –प्राचार्य जी.के.सानप



माजलगांव दि.१३ (प्रतिनिधी) :- सुंदरराव सोळंके महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधीचा विचार करून आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य जी. के. सानप यांनी केले. सुंदरराव सोळंके महाविद्याल यात आयोजित आयबीएम स्कील बील्ड प्रोग्राममध्ये ते बोलत होते. सुंदरराव सोळंके महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधीचा विचार करून आयबी एम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य जी. के. सानप यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. विकास सोळंके, पत्रकार कमलेश जाब्रस, प्रा. किरण गलबे, प्रा. सौरवकुमार सुमन, प्रा. जावेद चाउस, प्रा. देशमुख, प्रा. स्वामी, श्रीमती पायल, कल्पना राउत, सुमेरा शेख यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य सानप म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता सोळंके महाविद्यालय सातत्याने प्रयत्न शील आहे. आयबीएम प्रशिक्षणा च्या माध्यमा तून विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकाकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आगामी काळात नोकरीच्या संधीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात आले.

# स्वारातीम विद्यापीठाच्या २० डिसेंबरच्या परीक्षा पुढे ढकलल्या ; सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर

नांदेड दि.१३(प्रतिनिधी):- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. दरम्यान, दि.२० डिसेंबर, २०२५ रोजी होणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे त्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या पुढे ढकललेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमांच्या शेवटच्या दिवशी घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, दि. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या बी.व्होक (पीएसएसडी), बी.व्होक (एमएलटी), एम.लिब (न्यू व रिव्हाइज्ड) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आता २२ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच एल.एल.एम. प्रथम वर्ष व एम.पी.एड. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २३ डिसेंबर, २०२५ रोजी होतील.बी.व्होक सीएमई, बी. व्होक बी.एफ.एस.आय., बी.एस्सी. जनरल, बी.एड. प्रथम वर्ष, बी.पी.एड. प्रथम वर्ष, एम.एड. एम.लिब व एम.पी.एड. प्रथम वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार आहेत.एम.कॉम (जनरल), एम.कॉम (बँकिंग अँड इन्शुरन्स), एम.जे., एम.ए., एम.एस. डब्ल्यू. व एम.व्होक एफ.टी. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येतील. याचप्रमाणे एम.एस्सी. जनरल (एनईपी), एम.एस्सी. जनरल (सीबीसीएस), एम.एस्सी. एसई (सीबीसीएस) एम.एस्सी. सीएम (सीबीसीएस), एमसीए द्वितीय वर्ष व बी.ए. एल. एल.बी./ एल.एल.बी. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २७डिसेंबर २०२५ रोजी होतील. एम.जे. (न्यू) या अभ्यासक्रमाची परीक्षा २९ डिसेंबर, तर एम.जे. (रिव्हाइज्ड) ची परीक्षा ३१ डिसेंबर, २०२५ रोजी पार पडणार आहे. तसेच बीबीए व बीबीए (एबीएम) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत. या सुधारित वेळापत्रकाची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. तसेच सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# तपेनिमगाव परिसरात अवैधरित्या वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर तलवाडा पोलिसांनी पकडले

## सहा लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल

तलवाडा दि.१३ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस ठाणे हद्दीतील मौजे तपेनिमगाव परिसरात छुप्या मार्गाने केनीच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याची गोपनीय माहिती तलवाडा पोलिसांना मिळताच त्यांनी या अवैध वाळू उपशावर शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता दत्तबाग परिसरात धाड टाकली असता यामध्ये वाळू वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर पकडण्यात आले. या कारवाईत सहा लाख पाच हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हि कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, तलवाडा पोलीस ठाण्याचे सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, गोपनीय शाखेचे पोलिस कर्मचारी विठ्ठल राठोड यांनी केली आहे.



याप्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात ट्रॅक्टर चालक परमेश्वर भानुदास शिंदे रा. तपेनिमगाव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलवाडा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे तपेनिमगाव परिसरात मागील अनेक दिवसांपासून छुप्या मार्गाने ट्रॅक्टरच्या साह्याने अवैध वाळू उपसा सुरू आहे. वाळू घाटाचा कोणताही लिलाव झालेला नसतांना देखील वाळू उपसा व वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच तलवाडा पोलीसांनी हि कारवाई केली आहे. तहसीलदार संदिप खोमणे व महसूल विभागाचे कर्मचारी वाळू तस्करांकडून हप्ते गोळा करत असल्याने वाळू माफियांचे मनोबल वाढले असल्याची चर्चा गेवराई तालुक्यात जोरदारपणे ऐकावयास मिळत आहे. कोतवाल, तलाठी व मंडळ अधिकारी हे फक्त हप्ते गोळा करत असून या हप्तेखोरीमुळे वाळू माफिया कोणालाही जुमानत नाहीत हे वास्तव आहे. तलवाडा परिसरातील तसेच गेवराई तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या अनेक गावातून सर्रासपणे वाळू उपसा व वाहतूक सुरू आहे. जे हप्ते देतात त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. परंतु जे हप्ते देण्यास टाळाटाळ करतात त्यांच्यावर मात्र कारवाई केली जाते. याला पोलिस व महसूल विभाग जबाबदार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी याप्रकरणी जातीने लक्ष देऊन अवैध मार्गाने होणारा वाळू उपसा व वाहतूक याला पायबंद घालावा अशी मागणी लोकांकडून होऊ लागली आहे.

# बिबट्याच्या प्रकरणी वन अधिकाऱ्यांची लिंबागणेश ग्रामस्थांसोबत बैठक

## पिंजरे लावून तातडीने बंदोबस्ताची ग्रामस्थांची मागणी



लिंबागणेश दि१३ (प्रतिनिधी) – बीड तालुक्यातील लिंबागणेश गावाच्या पोखरवाडा शिवारात शुक्रवारच्या रात्री बिबट्याचा वावर आढळून आल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वनविभागाने तातडीने दखल घेतली आणि लिंबागणेश येथे ग्रामस्थांची बैठक घेऊन महत्त्वाच्या सूचना केल्या यावेळी ग्रामस्थांनी बिबट्याला पकडण्यासाठी वन खात्याने त्वरित पिंजरा लावावा अशी मागणी देखील केली.

पिंपरनई, पोखरी, बेलगाव, फुकेवाडी परिसरात घनदाट जंगल असल्यामुळे बिबट्यांचा व पिल्लांचा वावर वाढल्याची सूचना काही दिवसांपूर्वीच शेतकऱ्यांनी वनविभागाला दिली होती. मात्र, त्यावेळी अधिकृत नोंद नसल्याचे सांगण्यात आले होते. शुक्रवार दि १२ डिसेंबर च्या रात्री पोखरवाडा शिवारात बिबट्या स्पष्टपणे दिसून आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शनिवार दि. १३ रोजी सकाळी वनविभागाचे अधिकारी महेश मते यांनी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

यावेळी लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, मोहन कोटुळे, पांडुरंग वाणी, भगवान मोरे, रवी वायभट, कृष्णा वायभट, सुदाम मुळे, रमेश वाणी, संजय पावले, सुखदेव वाणी, विनायक वाणी, राजेंद्र कदम यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान या बैठकीत बिबट्याचा वावर वाढल्यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणे धोकादायक झाले आहे. महिला, लहान मुले व वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून अनेक पालकांनी मुलांना घराबाहेर जाण्यास मज्जाव केला आहे.

या पार्श्वभूमीवर बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तात्काळ पिंजरे लावावेत, ड्रोनद्वारे शोधमोहीम राबवावी तसेच रात्रीच्या वेळी वनविभागाची गस्त वाढवावी, अशी ठोस मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी वनसंरक्षक अशोक केदार व अधिकारी महेश मते यांच्याकडे केली.तर बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे.घराभोवती झुडुपे व गवत वाढू देऊ नये.जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, रात्री पुरेसा प्रकाश ठेवावा, लहान मुलांना एकटे बाहेर पाठवू नये,रात्री शेकोटी पेटवणे, मोठ्या आवाजात गाणी लावणे उपयुक्त ठरते असे वन विभागाचे अशोक केदार व महेश मते यांनी नमूद केले. अफवा पसरवू नये, वनविभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे व जनजागृतीद्वारे स्वतःचा बचाव करावा, असे आवाहन नेकनूर पोलीस ठाण्याचे फौजदार आप्पासाहेब रोकडे केले. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल राठोड, हवालदार गणेश परझने, मन्सूर शेख आदी उपस्थित होते.

# बीड पंचायत समितीचा अनिरूध्द सानप यांच्याकडे पदभार

बीड (प्रतिनिधी) : मग्रारोहयो अंतर्गत बीड तालुक्यामध्ये सन २०२३-२४ मधील डिलीट झालेले वर्ककोड लाभार्थ्यांकडून पैसे घेवून, नियमबाह्यपणे पुन्हा सन २०२५-२६ मध्ये काढल्याप्रकरणी गटविकास अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली होती. यानंतर दि.९ डिसेंबर रोजी वादग्रस्त गटविकास अधिकारी अशोक राठोड यांच्याकडील पदभार काढून त्याठिकाणी अनिरूध्द सानप यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बीड पंचायत समिती अंतर्गत मग्रारोहयोमध्ये बीड तालुक्यातील वैयक्तिक लाभार्थ्यांचे गायगोठा, वैयक्तिक जलसिंचन विहीर, शेततळे कामाचे सन २०२३-२४ मधील ७४०० वर्ककोड डिलीट झालेले आहेत. सदरील वर्ककोड हे कोणत्या आधारे डिलीट झाले याची माहितीही दिली जात नाही. तसेच डिलीट झालेले वर्क कोड हे पुनश्च सन २०२५-२६ मध्ये काढलेले ऑनलाईन पोर्टलवर दिसून येत आहेत. गटविकास अधिकारी अशोक राठोड व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुशिल जामकर यांनी संगनमत करून लाभार्थ्यांकडून पैसे घेवून डिलीट झालेले वर्ककोड सन २०२५-२६ मध्ये कुठलेही शासन आदेश नसताना काढल्याचे दिसून येत आहे, सदरील अधिकारी पैसे घेवून फक्त मर्जीतील लोकांचेच वर्ककोड काढत आहेत व उर्वरीत ७४०० लाभार्थ्यांचे वर्ककोड काढण्यास टाळाटाळ करीत आहेत. यामुळे त्यांच्यावर अन्याय होत आहे, अशी तक्रार दोन दिवसांपुर्वी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी पालकमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली होती. यानंतर तातडीने यंत्रणा हलली असून दि.९ डिसेंबर रोजी वादग्रस्त ठरलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड यांच्याकडे असलेला पदभार अनिरूध्द सानप यांच्याकडे देण्यात आला आहे.बळीराम गवते यांनी शेतकरी, सामान्य नागरिक यांचे हीत लक्षात घेवून कामचुकारपणा आणि चुकीचे काम करणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यांची तक्रार केली होती.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आधी कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरणार

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील रिक्त पदे मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आधी भरल्या जातील अशी घोषणा राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी आज (दि.१२) विधान परिषदेत केली.

कृषी विद्यापीठांमधील रिक्त पदासंदर्भात मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी आज विधान परिषदेत लक्षवेधी सूचना उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले.राज्याच्या कृषी क्षेत्राला दिशा देणाऱ्या आणि हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणार्या विद्यापीठातील रिक्त पदांमुळे अध्यापन व संशोधन कार्यास अडचणी येत असून कृषी शिक्षणाचा दर्जा खालावला जात असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी सभागृहात सांगत मार्च २०२६ पर्यंत कृषी विद्यापीठातील रिक्त जागा भरणार का?, सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्षपद बर्याच दिवसांपासून रिक्त असून त्याचा तात्पुरता पदभार कुणाकडे तरी द्यावा अशी आग्रही मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी सभागृहात केली. आ.सतीश चव्हाण यांच्या लक्षवेधीला कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ना.आशिष जयस्वाल यांनी उत्तर देतांना कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही अंतिम टप्यात असून मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आधी ही सर्व रिक्त पदे भरल्या जातील असे सांगितले. तसेच सेवा प्रवेश मंडळाच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात एमसीएईआरचे उपाध्यक्षांकडे दिला जाईल असे देखील कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी सभागृहात सांगितले.

# प्रा.विशाल साखरे यांना फार्मास्युटिकल सायन्स या विषयात पीएचडी



अंबाजोगाई दि १३ (प्रतिनिधी): येथील फार्मसी कॉलेज, अंबाजोगाई येथील प्रा.विशाल साखरे यांनी माधव विश्वविद्यालय, पिंडवारा सिरोही, राजस्थान येथून फार्मास्युटिकल सायन्स या विषयात पीएचडी मिळविली आहे. त्याबद्दल प्रा.साखरे यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन व स्वागत होत आहे.

डेव्हलपमेंट एँड एव्हॅल्युएशन ऑफ अनालिटिकल मेथड्स ऑफ सम ड्रग्स इन फार्मास्युटिकल फॉर्म्युलेशन हा प्रा.विशाल साखरे यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांना डॉ.सुशील भार्गव आणि डॉ.संतोष तरके यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी हे यश मिळविले आहे. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, संस्थेचे अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा.वसंतराव चव्हाण, डॉ.डी.एच.थोरात, प्राचार्य डॉ.बी.आय. खडकभावी, डॉ.विवेकानंद राजमान्य, प्रा.एस.ए.बिराजदार, डॉ.संतोष तरके, सर्व प्राध्यापक वृंद, मित्र व परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन व स्वागत करण्यात येत आहे.

# लिंबाचीवाडी साठवण तलाव क्र.१ च्या दुरुस्ती कामासाठी ८४ लाख २१ हजार रुपयांचा निधी मंजूर



अंबाजोगाई दि १३ (प्रतिनिधी) : तालुक्यातील लिंबाचीवाडी येथील साठवण तलाव क्र. १ च्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागला आहे. आ.नमिता मुंदडा यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या कामासाठी शासनाकडून तब्बल ८४ लाख २१ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असून, संबंधित विभागाकडून कामाचे कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देखील देण्यात आले आहेत. यामुळ परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

लिंबाचीवाडी येथील साठवण तलाव क्र. १ ची तातडीने दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे होते. या तलावाच्या दुरुस्तीमुळे पाणी साठवण क्षमतेत वाढ होऊन शेतकऱ्यांना सिंचनासाठी लाभहोणार आहे. ही बाब लक्षात घेऊन आ. नमिता मुंदडा यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या कामासाठी एकूण ८४ लाख २१ हजार ४७० रुपये एवढ्या रकमेची निविदा मंजूर करण्य आली आहे. यासाठी आ. मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री (गोदावरी खोरे) राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# मानव अधिकार परिषदेच्या वतीने इको बटालियनचे सैनिक शेख जलील दस्तगीर व हवालदार कृष्णा जाधव सन्मानित



किल्ले धारूर दि १३ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र आर्मी सेल चे अध्यक्ष व इको बटालियनचे सैनिक शेख जलील दस्तगीर यांना भारत गौरव अवार्ड देऊन व हवालदार कृष्णा जाधव यांचाही सन्मान त्यांच्या उत्कृष्ट योगदान बद्दल विश्व मानव अधिकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. त्यांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

विश्व मानव अधिकार परिषदेच्या वतीने धारूर येथील इको बटालियनचे सैनिक व आर्मी सेलचे प्रांत अध्यक्ष व इको बटालियनचे सैनिक शेख जलील दस्तगीर यांचा भारत गौरव आवार्ड तर उत्कृष्ट कार्या बद्दल हवालदार कृष्णा जाधव यांना ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन विश्व मानव अधिकार परिषदेच्या वतीने त्यांचे कार्याचा गौरव करण्यात आला व यापुढेही पर्यावरणासाठी असेच काम करण्यासाठी त्यांना प्रेरणा देण्यात आली. या दोन्हीही सैनिकांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आण्णासाहेब जगताप यांना शेतकरी शास्त्रज्ञ पुरस्कार ; परभणीत झाला सन्मान



माजलगाव (प्रतिनिधी) : तालुक्यातील सावरगाव येथील प्रगतशील शेतकरी आण्णासाहेब अर्जुन जगताप यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांच्या वतीने दिला जाणारा शेतकरी शास्त्रज्ञ पुरस्कार दि. ११ गुरूवारी प्रदान करण्यात आला.

तालुक्यातील सावरगाव येथील शेतकरी आण्णासाहेब जगताप व त्यांच्या पत्नी शारदा जगताप हे कुटूंबीय मागील अनेक वर्षांपासुन सेंद्रीय शेती व शेतीतील नव – नविन प्रयोग आव्हानावर मात करत करतात. त्याचबरोबर वैज्ञानिक शेती व्यवस्थापन, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब, नवकल्पना आणि ज्ञान प्रसाराच्या माध्यमातून कृषि क्षेत्राच्या विकासात मागील अनेक दिवसांपासुन ते कार्यरत आहेत. यावेळी बोलतांना आण्णासाहेब जगताप म्हणाले की, या पुरस्कारासाठी जिल्हा कृषी अधिक्षक सुभाष साळवे, विद्यापीठाचे ता.कृषि अधिकारी गणेश बादाडे, हनुमंत गरूड, धम्मदिप गडपाळे, सिध्देश्वर हजारे, रामेश्वर चांडक यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे सांगीतले. दरम्यान या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# तलवाडा पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई करून आरोपीची केली हर्सूल कारागृहात रवानगी


गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) : बीड जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत रूजू झाल्यापासून गुन्हेगारांना धडा शिकविण्यासाठी कठोर निर्णय घेतले जात आहेत. गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगारांना सुतासारखे सरळ करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तलवाडा पोलीस ठाणे हद्दीतील रोहितळ येथील रहिवासी असलेला कुख्यात आरोपी गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे हा



गावातील नागरिकांना मारहाण करणे, दमदाटी, धमक्या देणे, अवैधरित्या दारुची चोरटी विक्री करणे, महिलांवर अत्याचार करणे, अल्पवयीन मुलींना पळवून अत्याचार करणे यासारखे वेगवेगळ्या गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार करत होता. त्यामुळे परिसरातील लोकांमध्ये दहशत निर्माण झाली होती. त्यास गंभीर गुन्हे करण्यापासून रोखण्यासाठी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुध्दा करण्यात आली होती. मात्र त्याच्यावर काहीच परीणाम होत नसल्याने सर्वसामान्य जनतेच्या मनात भिती निर्माण झाली होती. गावातील लोकांच्या जिवीतास तो बाधा निर्माण करत होता. त्यामुळे मा.जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी बीड यांनी गोवर्धन सिध्देश्वर येलजाळे याचे एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबध्दतेचे आदेश जारी केल्याने तलवाडा पोलीसांनी तात्काळ त्यास ताब्यात घेवून त्याची हर्सूल कारागृहात रवानगी केली आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, तलवाडा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल कोळी, उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, पोलिस हवालदार अंजन गडदे, विठ्ठल राठोड, पोलिस नाईक सचिन गायकवाड, पोलिस अंमलदार विशाल वडमारे, विकास थोरात, पवन शेळके यांनी हि कामगिरी बजावली आहे. या कामगिरी बद्दल तलवाडा व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांनी पोलिसांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले आहे.

# वसुधैव कुटुंबकम हीच आपली भारतीय संस्कृती–सुहास वैद्य

## स्वा.सावरकर महाविद्यालयात वा.ल.कुलकर्णी व्याख्यानमाला



बीड (प्रतिनिधी) : वैश्विक बंधुभाव, सहानुभूती आणि जागतिक सहकार्याची शिकवण देणारी आपली संस्कृती आहे, जिथे प्रत्येक व्यक्ती जागतिक समाजाचा भाग आहे आणि सर्वांनी आदराने वागले पाहिजे.अशी भावना सर्वांची आहे.कुटुंब व्यवस्था भक्कम झाली तर समाज सुदृढ, बलशाली, समृद्ध बनेल असे प्रतिपादन सुहास वैद्य यांनी वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमालेत बोलताना केले.

महाविद्यालयामध्ये प्रा. वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते सुहास वैद्य यांनी पंचपरिवर्तन मराठी साहित्य आणि कुटुंब प्रबोधन विषयावर सविस्तर विचार मांडले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे ,मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना सुहास वैद्य म्हणाले की कुटुंब हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. हा पाया भक्कम राहिला पाहिजे, म्हणजे समाज एकसंघ होऊन समृद्धीकडे आपली वाटचाल होईल. कुटुंब व्यवस्था मजबूत राहणे समाजासाठी आवश्यक आहे. या प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. योगिता होके म्हणाल्या की साहित्याची समीक्षा करणे हे अत्यंत अवघड असे काम आहे. वा.ल. कुलकर्णी यांचे साहित्य आणि समीक्षा क्षेत्रात मोठे योगदान आहे. तुमच्या माझ्या मनातील भावना भाषेच्या माध्यमातून साहित्यामध्ये प्रतिबिंबित होत असतात.मराठवाड्याला अत्यंत समृद्ध साहित्याची परंपरा आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सुहास मोराळे म्हणाले की प्रा. वा.ल. कुलकर्णी हे उत्तम समीक्षक होते .या व्याख्यानमालाच्या रूपाने त्यांच्या समीक्षा आणि साहित्यकृतीला उजाळा मिळेल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ सोपान सुरवसे यांनी केले. त्यांनी वा.ल.कुलकर्णी यांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन व्याख्यानमाला आयोजनाच्या पाठीमागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीधर आघाव यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख गंगाधर उषमवार,प्राचार्य राहुल देशपांडे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.उत्तम साळवे, महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# आदर्श ग्रामपंचायत आवरगाव चा आदर्श उपक्रम ;गावातील महिलांच्या आरोग्याची काळजी घेत घेतले आरोग्य शिबिर

किल्ले धारूर दि १३ (प्रतिनिधी)– तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत आवरगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावाला ॲनिमिया मुक्त करण्याच्या उद्देशाने विशेष महिला आरोग्य शिबीर घेण्यात आले.. या शिबिरात महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देत विविध तपासण्या व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या आरोग्य शिबिरात स्त्री रोग तज्ञ डॉ. चेतन आदमाने सर, स्त्री रोग तज्ञ सौ. आदमाने मॅडम, डॉ.चौधरी सर , डॉ. अरविंद निकते सर, डॉ. भोसले मॅडम डॉ. वाघमारे सर व सर्व आरोग्य टीमने उपस्थित महिलांची सखोल तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान महिलांची एचबी (हिमोग्लोबिन) तपासणी, शुगर तपासणी, बीपी तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यक त्या औषधांचा मोफत पुरवठाही करण्यात आला. आरोग्य तपासणीसोबतच महिलांना आहार, स्वच्छता आणि आरोग्यविषयक सल्लाही देण्यात आला.या कार्यक्रमासाठी आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप, ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे, तसेच पत्रकार सूर्यकांत जगताप यांची उपस्थित होती. या आरोग्य शिबिरामुळे महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, गाव ॲनिमिया मुक्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पार्श्वभूमी

दि.१४ डिसेंबर २०२५ रविवार




## सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे निधन



माजलगांव दि.१३(प्रतिनिधी):- येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे वय ८५ वर्षे, यांचे वृद्धापकाळाने दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४वा. राहते घरी निधन झाले. सम्राट अशोक नगर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे वय ८५ वर्षे, यांचे वृद्धापकाळाने दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४ वा. राहते घरी पान २ वर

## राधाबाई दशरथ पवार यांचे निधन



पिंपळवंडी दि.१३(प्रतिनिधी) :- पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील राधाबाई दशरथ पवार वय ९० वर्षे यांचे शुक्रवार दि १२ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने पिंपळवंडी व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांचा स्वभाव शांत, संयमी, मनमिळावू होता.त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर दि.१२ शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता पान २ वर

### केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात नवनाथअण्णा शिरोळेंकडून अन्नदान



बीड दि १३ (प्रतिनिधी)- माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या दरम्यान बीड शहरातील नवि भाजी मंडई येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील वयोवृद्ध ३७ वृद्धांना भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या वतीने भोजनदान करण्यात आले.

स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी आदर्शदायक काम केले आहे. त्यांनी सर्व समाजासाठी समाज हिताचे कार्य करून भारत देशामध्ये एक बीड जिल्ह्याचा नाव लौकिक केला आहे म्हणून त्यांचाच एक आदर्श घेऊन आम्ही पुढे जात आहोत. बीडला रेल्वे यावी यासाठी मुंडे साहेबांनी खूप मोलाचे प्रयत्न केले आज बीडला रेल्वे आली यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. असे या ठिकाणी आभार व्यक्त करताना नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी विचार मांडताना नमूद केले व मुंडे साहेबांचे विचार सर्वांनी अकस्मात करावे आणि त्या विचाराने चालावे असे आवाहन देखील केले. तर मनोगत पर बोलताना सर्जराव तात्या यांनी स्वर्गीय मुंडे साहेबांच्या कार्याची थोडक्यात ओळख दिली यावेळी श्रीमती मीराताई गांधले मॅडम यांनी देखील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या विचारांना चालना देऊन आम्ही पुढे महाराष्ट्र राज्याच्या पान २ वर

### न्यायाबरोबर माणुसकीचे दर्शन ; लोकन्यायालयात दोन कुटुंबांचा समेट

## एकूण २३४ प्रकरणी निकाली तर आठ लाखांची झाली वसुली

पाटोदा - येथील दिवाणी न्यायालयात दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित लोकन्यायालयात केवळ कायदेशीर निकाल नव्हे तर मानवी संवेदनांचा विजय पाहायला मिळाला असून समुपदेशनाच्या प्रभावी प्रक्रियेतून दोन कुटुंबांतील पती-पत्नींमधील दीर्घकाळाचे मतभेद दूर होऊन त्यांनी पुन्हा एकत्र येण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला, या लोकन्यायालयात पॅनल क्रमांक एकवर पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा एम.ए.शिंदे व पॅनल सदस्य बी.जी.थोरवे तर पॅनल क्रमांक दोनवर पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वडवणी व्ही. डी. गीते व पॅनल सदस्य म्हणून विधीज्ञ बी.आर.लऊळ यांनी काम पाहिले, चालू वर्षातील ८८५ दाखल प्रकरणांपैकी २३ प्रकरणे तसेच पूर्वी दाखल असलेल्या ८९८ प्रकरणांपैकी २११ प्रकरणे अशा एकूण २३४ प्रकरणांचा यशस्वी निकाल लागून ८ लाख २४ हजार ८८७ रुपये वसुली झाली, कौटुंबिक वाद मिटवून संसार वाचविण्यात लोकन्यायालयाची भूमिका निर्णायक ठरली असून हे लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी पाटोदा न्यायालयातील सर्व विधीज्ञ व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.




बीड : येथील योजना शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी पदी रुजू झालेल्या किरण कुंवर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी उपशिक्षणाधिकारी सोनटक्के,सहाय्यक योजनाधिकारी खतिब,विस्तार अधिकारी हजारे, राऊत सर,बांगर सर,पाटोद्याचे गटशिक्षणाधिकारी गोंदाडे आदी.

## शिवसेना उबाठा जि.प.,पं.स. निवडणूक ताकतीने लढवणार–परशुराम जाधव

केज दि १३ (प्रतिनिधी)- शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या उपस्थितीत व माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या अध्यक्षते खाली केज, अंबाजोगाई, परळी तालुका शिवसेना, युवा सेना,महिला आघाडी पदाधिकाऱ्याची बैठक बीड जिल्हा संपर्क कार्यालय केज येथे संपन्न झाली.सदरील बैठकीत येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकी संदर्भात गट निहाय,बुथनिहाय पान २ वर

## बियाण्याचा खर्च शून्य ; उन्हाळी तिळासाठी शेतकऱ्यांना मिळणार १००% अनुदान

### पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मोठी संधी ; तिळ लागवडीला चालना देणारी योजना

पाटोदा दि.१३(प्रतिनिधी):- पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, उन्हाळी हंगामात कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन मिळावे तसेच तेलबियांच्या उत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया (छ्चएज-उड) अंतर्गत पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२५ साठी उन्हाळी तिळ पिकाच्या १०० टक्के अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरण करण्यात येणार असून, याचा थेट लाभ तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे. या अभियानाचा मुख्य हेतू खाद्यतेलांच्या आयातीवरील देशाचे अवलंबित्व कमी करणे, तेलबियांचे क्षेत्र वाढवणे आणि शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढवणे हा आहे. या अंतर्गत उन्हाळी तिळासाठी प्रति हेक्टर २.५ किलो प्रमाणित बियाणे केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदानावर देण्यात येणार आहे. या घटकासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर ते कमाल १ हेक्टर इतक्या क्षेत्रापुरता लाभ मर्यादित ठेवण्यात आला आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांकडून उन्हाळी तिळाचे बियाणे ५०० ग्रॅम किंवा १ किलो या पॅकिंग साईजमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या क्षेत्रानुसार आवश्यक प्रमाणित बियाणे पॅकिंग साईजच्या आधारे वितरित करण्यात येईल. पान २ वर

## बीड जिल्हयातुन १९०४ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- १३ डिसेंबर २०२५ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन कार्यक्रम आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते संपन्न झाले.सदर उदघाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ व्ही.एच.पाटवदकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस.एस.घोरपडे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डब्ल्यू.ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष आर.व्ही. देशमुख तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ सदर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व आनंद एल.यावलकर साहेब प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण. १९०४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ८२६५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय. अॅक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ५४३ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ३३२२१. प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १३६१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण १९०४ प्रकरणे निकाली पान २ वर

## संचेती हॉस्पिटलची ६० वर्षे पूर्ण भविष्य केंद्रित अद्ययावत ऑर्थोकेअर

### सुविधेचे व एआय इनोव्हेशन लॅब चे अनावरण




संचेती अॅडव्हान्स ऑर्थोकेअर हॉस्पिटलचे प्रमुख डॉ.यशवंत शिवण्णा, विपणन व संपर्क विभागाच्या संचालक सौ.रूपल संचेती , संचेती हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.पराग संचेती , संचेती हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ.के.एच.संचेती, ऍकेडेमिक रिसर्च डिव्हिजनचे (शैक्षणिक संशोधन विभाग) प्रमुख डॉ.अशोक श्याम, संचेती इन्स्टिट्युट फॉर ऑर्थोपेडिक्स अॅन्ड रिहॅबिलिटेशनचे प्रमुख डॉ.लवनिश त्यागी आणि फिजिओ थेरपी विभागाच्या प्रमुख डॉ.दर्शिता नरवानी (डावीकडून उजवीकडे)

पुणे दि.१४(प्रतिनिधी):- भारतात आर्थोपेडिक केअर मध्ये सर्वांत विश्वसनीय संस्थांपैकी एक असलेल्या संचेती हॉस्पिटलची ६० वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्ताने भविष्यकेंद्रित उपक्रमांची घोषणा करण्यात आली.त्यामध्ये अद्ययावत ऑर्थोकेअर सुविधा,एआय इनोव्हेशन लॅब,एआय चलित डायग्नोस्टिक्स व रिहॅबिलिटेशन सुविधेमध्ये विस्तार,गरजू रुग्णांपर्यंत पोहचण्यासाठी मोबाईल ऑर्थोकेअर युनिटस आणि एआय ने प्रेरित सॅनबो मॅस्कॉटचे अनावरण या सर्व उपक्रमांचा समावेश आहे.

पद्मश्री,पद्मभूषण व पद्मविभूषण डॉ.के.एस.संचेती यांनी या संस्थेची स्थापना १२ डिसेंबर १९६५ ला केली. १० बेडसच्या छोट्या रूग्णालयापासून ते दरवर्षी लाखो रुग्णांवर उपचार करण्याच्या क्षमतेपर्यंत रूग्णालयाने प्रवास केला आहे.मोबिलिटी इज डिग्निटी या तत्त्वाद्वारे संचेती हॉस्पिटलने आस्थरोगशास्त्र,पुर्नवसन,संशोधन आणि वैद्यकीय शिक्षणात आपला ठसा उमटवला आहे.

गेल्या ६ दशकांमध्ये हॉस्पिटलने सांधेरोपण,मणक्याचे उपचार,बाल आस्थरोग शास्त्र, ट्रॉमा,स्पोर्ट्स मेडिसिन,ऱ्हुमॅटोलॉजी, न्युरो रिहॅबिलिटेशन आणि इतर उपशाखांमध्ये व्यापक सेवा परिसंस्था निर्माण केली आहे.भारत आणि भारताबाहेरील रूग्णांसाठी संचेती हॉस्पिटल हे गुंतागुंतीच्या आस्थरोग परिस्थितीवर उपचारासाठी रेफरल सेंटर म्हणून नावलौकिक कमावले आहे.

सहा दशकांचा हा महत्त्वाचा टप्पा पार करत असताना संचेती डव्हान्स्ड ऑर्थोकेअर हॉस्पिटल ही नवीन १५० बेडसची सुविधा सुरू करण्यात आली असून यामुळे पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय उपचार क्षमतेमध्ये विस्तार झाला आहे. पान २ वर

## कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र अॅन्ड गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नोटरी अॅड.राहुलकुमार राका निवड



बीड/गेवराई :- महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्षपदी भारतीय जनता पार्टी चे संस्थापक सदस्य भाजपाचे युवा नेते तथा दी वैद्यनाथ बँक सल्लागार व दैनिक बीड वास्तव उपसंपादक नोटरी अॅड.राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्षपदी व प्रवक्तेपदी महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष व अल्पसंख्याक मोर्चा चे प्रदेश महासचिव सय्यद सिकंदर अली व जैन अधिवक्ता चे प्रदेशाध्यक्ष व नोटरी असोसिएशनचे उपाध्यक्ष नोटरी ड महावीर. एम.कांकरीया , महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष नोटरी ड यशवंत खराडे , महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे सेक्रेटरी प्रवीण नलावडे व कोअर कमिटी ने यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करुन विशेष नियुक्ती करण्यात आली त्यांच्या या निवडी बद्दल महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन चे पदाधिकारी , नोटरी बांधव, वकील बांधव व भारतीय जनता पार्टीच्या मित्र परिवाराने व पत्रकार बंधूंनी शुभेच्छा दिल्या व पुढील वाटचालीस सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.सर्व मित्रांचे नवनिर्वाचित महाराष्ट्र अॅन्ड गोवा नोटरी असोसिएशनचे प्रवक्ते प्रदेश उपाध्यक्ष अॅड.राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांनी आभार मानले.

## सकाळच्या सत्रातील शाळेच्या वेळेत बदल करावा–सौ.छाया बंडू कुलथे



माजलगाव (प्रतिनिधी):- सध्या जिल्ह्यात मागिलं काही दिवसांपासून हाडं गोठविणारी कडाक्याची थंडी पडली असून सकाळ च्या सत्रातील अंगणवाडी बालवाडी व प्राथमिक वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्वच विद्यार्थ्यां ची शाळा साधारण सकाळी सात ते बारा आसी वेळ असते त्यात शाळेने वेळेत बदल करून सकाळी आठ ते एक करण्यात यावी अशी मागणी सुवर्णकार सामाजिक कार्यकर्त्या सौ छाया बंडू कुलथे सादोळकर यांनी केली असून या थंडी मुळे वयोवृद्ध व लहान बालके सर्दी थंडी ताप खोकला या आजाराने आजारी पडतं असुन किमान थंडी कमी होईपर्यंत तरी शाळेच्या वेळेत बदल करण्यात यावा व वयोवृद्ध व लहान बालके यांनी स्विवेटर सारखी उपदार कपडे परिधान करावी आसा सल्ला पण मुलाखतीतून दिला असुन सकाळ च्या सत्रातील शाळेच्या वेळात तात्काळ बदल करण्याची मागणी सुवर्णकार सामाजिक कार्यकर्त्या सौ छाया बंडू कुलथे यांनी शाळा प्रशासनाकडे पान २ वर

## चांगला भाव द्या, नसता आसूड घेऊन सरकारला जाब विचारू–अजय दाभाडे

गेवराई दि.१३(प्रतिनिधी):- हाती आसूड घेऊन जाब विचारण्याची वेळ आली आहे. शेतकर्यांचा शेत माल, व्यापाऱ्यांकडून कवडी मोल किंमतीने घेतला जात असून, सरकारचा हमी भाव म्हणजे लबाडाचे आमंत्रण आहे. सरकार शेतकऱ्यांची चेष्टाच करणार असेल, तर आसूड मोर्चा काढून जाब विचारू, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ता.प्रमुख अजय दाभाडे यांनी दिला आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात अजय दाभाडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा धिक्कार केला असून, हे सरकार शेतकर्यांची चेष्टाच करीत आले आहे. गेल्या महिनाभरात सरकारने मदतीची घोषणा केली. काही शेतकर्यापर्यंत अजूनही एक पैसा खात्यावर आला नाही. आधीच शेतकरी बेजार आहे. खरीप हंगाम वाया गेला. नुकसान भरपाई खात्यावर आली नाही. केवायसी च्या नावाखाली तहसील प्रशासन, तलाठी, मंडळ अधिकारी शेतकर्यांची दिशाभूल करीत आहेत. प्रशासन आणि सरकार दुटप्पी वागणूक देत असून, देवेंद्र फडवणीस यांच्या सरकार मुग गिळून गप्प बसले आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला सरकारने योग्य भाव दिला पाहिजे आणि शेतकरी बापाला वाचवले पाहिजे. मात्र हे सरकार ढोंगी आहे. त्यामुळे लबाडाचं आमंत्रण जेवल्याशिवाय काही खरं नाही. सरकार नुसत्या घोषणा करते आणि शेतकऱ्यांना उपाशी ठेवते. म्हणजे, सरकार तुपाशी व्यापारी तुपाशी आणि शेतकरी मात्र उपाशी. शेतकऱ्यांना जर हमीभाव दिला नाही आणि पान २ वर

## विद्यापीठ अंकेक्षणात सावरकर महाविद्यालयाला 'ए प्लस' ग्रेड



बीड दि १३ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने केलेल्या शैक्षणिक आणि प्रशासकीय अंकेक्षणात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वा. सावरकर महाविद्यालयाला ए प्लस ग्रेड मिळाला असून महाविद्यालयाचे प्राचार्य आणि आणि टीमचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांचे प्रशासकीय आणि शैक्षणिक अंकेक्षण करण्यात आले असून त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या मध्ये सावरकर महाविद्यालयाला ए प्लस ग्रेड मिळाल्याबद्दल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पान २ वर

### सामुदायिक प्रयत्नाचे यश- हेमंत वैद्य

सावरकर महाविद्यालयाला विद्यापीठाच्या अंकेक्षणामध्ये ए प्लस ग्रेड मिळाला ही बाब अभिनंदनीय आहे. सामुदायिक प्रयत्ना मुळे हा टप्पा गाठता आला. पुढच्या ऑडीट मध्ये महाविद्यालय ए डब्बल प्लस ग्रेड मिळविले. संस्था पातळीवर सर्व मदत महाविद्यालयाला दिली जाईल, असे हेमंत वैद्य यांनी म्हटले आहे.

## पत्रकार अविनाश कदम यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर



आष्टी प्रतिनिधी :- मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमातर्फे यावर्षीचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार दै लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली.

अविनाश कदम हे दैनिक लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आहेत. गेल्या १७ वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय असलेल्या कदम यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, धार्मिक या विविध क्षेत्रांतील गोरगरीब व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या पान २ वर

## साई सेवा परिवार बीड ते शिर्डी पाई पालखी सोहळा संपन्न

### साई सेवकांनी बाबांचे घेतले मनोभावे




बीड दि.१३(प्रतिनिधी):- गुरुदत्त जयंतीचे औचित्य साधून बीड ते श्री क्षेत्र शिर्डी १० दिवसीय पायी वारीचे आयोजन श्री साई सेवा परिवार बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेले होते.हा सोहळा ४ डिसेंबर रोजी प्रारंभित झालेला होता तर हा पायी पालखी सोहळा १३ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या पायी पालखी सोहळ्याचे हे १९ वे वर्ष सुखाने व समृद्धीने संपन्न झालेले आहे. सर्व जाती-धर्मातील युवकांना एकत्र करत श्री साई सेवा परिवार हा गेल्या १९ वर्षांपासून या सोहळ्याचं आयोजन करत झालेला आहे. काल हाच पायी पालखी सोहळा शिर्डी या ठिकाणी मोठ्या थाटामाटात व उत्साहामध्ये संपन्न झालेला पान २ वर

CMYK